# महाराष्ट्र विधानपरिषद

## पाचवे (हिवाळी) अधिवेशन, २०२४

---

### अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

### प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यातील लघु व मध्यम पाटबंधारे प्रकल्पाबाबत

**(१) २०१५२ (०४-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाळीसगाव (जि.जळगाव) तालुक्यात सन १९९६-९७ ते १९९९-२००० या कालावधीतील किती लघु व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून त्यापैकी किती प्रकल्पांना निधी उपलब्ध करून दिला असल्याने प्रकल्प पूर्ण करण्यात आले आहेत,
(२) असल्यास, या प्रकल्पांमुळे तालुक्यातील किती जमीन सिंचनाखाली आली अथवा येणार आहे, या प्रकल्पासाठी किती निधी खर्च करण्यात आला, तसेच अपूर्ण अवस्थेत असलेले प्रकल्प पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-०७-२०२४) :** (१) जळगांव पाटबंधारे प्रकल्प मंडळ, जळगांव या बांधकाम मंडळाच्या अधिपत्याखाली १९९६-९७ ते १९९९-२००० कालावधीत i) वरखेडे लोंढे बॅरेज मध्यम प्रकल्प ता.चाळीसगांव ii) ल.पा.तलाव मुंदखेडा, iii) ल.पा.तलाव जामडी, iv) ल.पा.तलाव हातगांव -२, v) ल.पा.चितेगांव vi) ल.पा.त. बाणगांव vii) सा.त. ओढरे या सात प्रकल्पांना प्रशासकीस मान्यता देण्यात आली आहे. वरील सर्व प्रकल्पांना निधी उपलब्ध करून देण्यात आला असून त्यापैकी वरखेडे लोंढे बॅरेज मध्यम प्रकल्पाच्या मुख्य बॅरेजचे काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच बाणगांव, ओढरे, जामडी व चितेगांव या चार प्रकल्पांना शासनाकडून निधी प्राप्त झाल्याने भौतिक कामे पूर्ण झालेली आहेत आणि उर्वरीत दोन प्रकल्प हातगांव-२ व मुंदखेडा हे प्रकल्प भूसंपादनची अडचण व अपुरा निधी अभावी पूर्ण करता आले नाही.
(२) वरखेडे लोंढे बॅरेज मध्यम प्रकल्पामुळे ८२९० हे. जमीन सिंचनाखाली येणार आहे. त्यात चाळीसगाव तालुक्यातील ५५०० हे. व भडगाव तालुक्यातील २७९० हे. जमीन आहे. सदर प्रकल्पाच्या बंदिस्त नलिकेद्वारे सिंचन वितरण प्रणालीच्या कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आलेले असून सदर काम प्रगतीत आहे. सदर प्रकल्पाचा तृतीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक

येथे सादर असून पुढील कार्यवाही प्रगतीत आहे. सदर प्रकल्पावर मे, २०२४ अखेर रुपये ४२७.४५ कोटी खर्च करण्यात आले आहे. सन २०२४-२५ मध्ये रुपये ३८.९० कोटीची वार्षिक आखणीत तरतूद करण्यात आली आहे.

ल.पा.तलाव मुंदखेडा या प्रकल्पाचे एकूण सिंचन क्षेत्र १६७४ हे. असून एकूण रुपये २४९.६१ कोटी इतका निधी शासनाकडून उपलब्ध होऊन खर्च करण्यात आलेला आहे. सन २०२४-२५ मध्ये रुपये ०.५५ कोटीची वार्षिक आखणीत तरतूद करण्यात आली आहे.

ल.पा.तलाव जामडी या प्रकल्पाचे एकूण सिंचन क्षेत्र २९२ हे. असून एकूण रुपये १८.०४ कोटी इतका निधी शासनाकडून उपलब्ध होऊन खर्च करण्यात आलेला आहे.

ल.पा.तलाव हातगाव-२ या प्रकल्पाचे एकूण सिंचन क्षेत्र ६४१ हे. असून एकूण रुपये ३८.६४ कोटी इतका निधी शासनाकडून उपलब्ध होऊन खर्च करण्यात आलेला आहे. सन २०२४-२५ मध्ये रुपये ०.१२ कोटींची वार्षिक आखणीत तरतूद करण्यात आली आहे.

ल.पा.तलाव चितेगाव या प्रकल्पाचे एकूण सिंचन २६७ हे. असून एकूण रुपये ३५.१० कोटी इतका निधी शासनाकडून उपलब्ध होऊन खर्च करण्यात आला आहे.

ल.पा.तलाव बाणगांव या प्रकल्पाचे एकूण सिंचन क्षेत्र ३३२ हे. असून एकूण रुपये १९.१४ कोटी इतका निधी शासनाकडून उपलब्ध होऊन खर्च करण्यात आला आहे.

सा.त.ओढरे या प्रकल्पाचे एकूण सिंचन क्षेत्र ८०३ हे असून एकूण रुपये ५०.१५ कोटी इतका निधी शासनाकडून उपलब्ध होऊन खर्च करण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये रुपये ०.३८ कोटीची वार्षिक आखणीत तरतूद करण्यात आली आहे. मा.राज्यपाल यांचे निधी उपलब्धतेच्या सूत्रानुसार महामंडळास उपलब्ध होणाऱ्या निधीनुसार उर्वरित दोन प्रकल्प पूर्ण करणेचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## घोडविंदे पाडा (ता.वाडा, जि.पालघर) या गावातील रस्त्यावर आर.के.एक्स्पोर्ट मेट कंपनीने अनधिकृत बांधकाम करून अतिक्रमण केले असल्याबाबत

**(२) २०८७० (११-०७-२०२३) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुसारणे ग्रामपंचायत हद्दीतील घोडविंदे पाडा (ता.वाडा, जि.पालघर) या गावात जाण्यासाठी असलेल्या रस्त्यावर आर.के. एक्स्पोर्ट मेट कंपनीने अनधिकृत बांधकाम करून अतिक्रमण केले असल्याची बाब दिनांक १९ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कंपनीस वाडा – भिवंडी महामार्गालगत संरक्षण भिंतीचे सुरु असलेले अनधिकृत बांधकाम थांबविण्याचे आदेश तहसिलदार, वाडा यांनी दिलेले असतानाही कंपनीने बांधकाम सुरूच ठेवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुसारणे ग्रामपंचायत हद्दीतील घोडविंदे पाडा (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायत हद्दीतील घोडविंदे पाडा या गावात जाण्यासाठीच्या रस्त्यावर आर.के.एक्स्पोर्ट मेट कंपनीने अनधिकृत बांधकाम करून केलेले अतिक्रमण तात्काळ हटविण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (२५-०७-२०२४) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) मे.आर.के. एक्सपोर्ट मेट कंपनीला जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने दिनांक १५/०२/२०२३ रोजी बांधकाम थांबविण्यासाठी नोटीस दिली. संबंधित कार्यालयाने दिनांक ०४/०७/२०२३ रोजी पाया बांधकाम स्वखर्चाने हटविणेबाबत कंपनीला कळविले असून सदरचे अनधिकृत बांधकाम कंपनीने विहीत मुदतीत काढून न टाकल्यास निष्कासनाची कार्यवाही केली जाईल याबाबत दिनांक ११/०७/२०२३ रोजी पुनश्च कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात दोन साखर कारखान्यांमधील २५ कि.मी. हवाई अंतराची अट रद्द करण्याबाबत

**(३) २१३७७ (०३-०१-२०२४) : श्री.गोपीचंद पडळकर, श्री.प्रविण दटके : सन्माननीय सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील साखर कारखानदारी मध्ये पारदर्शकता येण्याच्या व स्पर्धात्मक दृष्टीकोनातून दोन साखर कारखान्यांमधील २५ किलोमीटर हवाई अंतराची अट शिथिल करण्याबाबत राज्यातील शेतकरी व शेतकरी संघटना मागणी करीत असून, शेतकरी ज्या कारखान्याला ऊस देतात, त्या कारखान्यांकडून त्यांना सभासदत्व देण्यात येत नाही, अशा कारखान्यांकडून सभासदत्व देण्याबाबतची मागणी देखील शेतकरी वर्ग व लोकप्रतिनिधींकडून करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने दोन साखर कारखान्यांमधील २५ किलोमीटर हवाई अंतराची अट शिथिल करण्याबाबत तसेच ऊस पुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांना संबंधित कारखान्यांकडून सभासदत्व देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०४-०७-२०२४) :** (१) होय.

(२) दोन साखर कारखान्यांमधील २५ किलोमीटर असलेले हवाई अंतराची अट शिथिल करण्याबाबत साखर आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ३०/११/२०२३ अन्वये समिती गठीत करण्यात आली असून समितीने हवाई अंतरांची अट शिथिल करण्यात येऊ नये असे अभिप्राय दिले आहेत.

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम २२ व २३ नूसार सहकारी साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रातील सभासद होवू इच्छिणाऱ्या व्यक्तीस कारखान्याकडे सभासदत्वासाठी अर्ज करता येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील हजारो आदिवासी विद्यार्थ्यांचे स्थलांतरण रोखण्याबाबत

**(४) २१४०९ (०३-०१-२०२४) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आदिवासी गावातील विद्यार्थी माहे सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यामध्ये पालकांसोबत रोजगारासाठी स्थलांतरीत होत असल्यामुळे हजारो आदिवासी विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या स्थलांतरीत आदिवासी मुलांच्या शिक्षणासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावित (०४-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२) राज्यातील आदिवासी गावांतील पालक हे रोजगारासाठी दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत होतात. परंतु शासकीय व अनुदानित आश्रमशाळा ह्या निवासी असल्याने जरी पालक रोजगारासाठी स्थलांतरीत झाले तरीही विद्यार्थी निवासी शाळेत शिक्षण घेत असल्याने विद्यार्थ्यांचे स्थलांतर होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सिंधुदूर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील रो.ह.यो. हजेरी सहाय्यकांना शासकीय सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत

**(५) २२४२८ (०३-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदूर्ग तसेच रत्नागिरी जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेंतर्गत कार्यरत असलेल्या हजेरी सहाय्यकांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासंदर्भात श्रीकांत म. गुरव व अन्य हजेरी सहाय्यक यांनी दिनांक १७ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास मा.पालक मंत्री, सिंधूदुर्ग यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रोजगार हमी योजनेंतर्गत नागपूर विभागातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, वर्धा येथे हजेरी सहाय्यक म्हणून कार्यरत असलेले, शासनाच्या प्रचलित धोरणानुसार दिनांक २६ मे, १९९३ ते दिनांक ३१ मे, १९९३ या काळात कार्यरत नसतानाही त्यांना उप जिल्हाधिकारी तथा उप जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी त्यांचे पत्र क्र. मगाराग्रारोहयोमअका.१/कावि-४०६/ दिनांक १८ डिसेंबर, २०१३ रोजी सामावून घेतल्यासंदर्भातील कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (डेस्क – ३, मंत्रालय) यांना कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील रोजगार हमी योजनांतर्गत हजेरी सहाय्यक म्हणून कार्यरत असलेले व ज्यांना अद्यापी शासकीय सेवेत सामावून घेण्यात न आलेल्या उपरोक्त सर्व हजेरी सहाय्यकांना विनाविलंब शासकीय सेवेत सामावून घेण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०४-०७-२०२४) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) शासन नियमात तरतूद नसल्याने अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

वि.प. २ (५)

## राज्यातील उप जिल्हाधिकारी संवर्गाची ज्येष्ठता यादी प्रसिध्द न केल्याबाबत

**(६) २२८४३ (२२-०२-२०२४) प्रा.राम शिंदे, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उप जिल्हाधिकारी संवर्गाची ज्येष्ठता यादी मागील १७ वर्षांपासून प्रसिध्द न केल्याने उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी त्यांना मिळणाऱ्या लाभांपासून वंचित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर यादी माहे एप्रिल, २०२३ पर्यंत जाहीर करून या संवर्गासाठी मिळणारे लाभ देण्यात येतील असे आश्वासन मा.महसूल मंत्री महोदयांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२३ मध्ये विधान परिषद सभागृहात दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त आश्वासनाची शासनाने अद्याप पूर्तता न केल्याने उपजिल्हाधिकारी संवर्गातील अनेक अधिकारी वंचित असतानाच बरेच अधिकारी नियत वयोमानानुसार सेवानिवृती झाल्याने त्यांनाही मिळणारे लाभ शासन देणार काय तसेच सदर यादी जाहीर करून रिक्त असलेल्या सर्व ठिकाणी पदोन्नतीने नेमणूक करण्यात येणार काय,

(४) असल्यास, अतिरिक्त जिल्हाधिकारी ही पदे न भरल्यामुळे अनेक जात पडताळणी समित्यांतील बरेच पदे रिक्त असल्याने समित्यांचे कामकाज ठप्प आहे, यानुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१६-०७-२०२४) :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र उप जिल्हाधिकारी (सेवाप्रवेश, ज्येष्ठता निश्चित करणे व स्थायीकरण) नियम, १९७७, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.११३६८/२०१९ व इतर प्रकरणी दिनांक १८/१२/२०१९ व मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण, मुंबई यांनी दिनांक ०६/१०/२०२० अन्वये दिलेल्या न्यायनिर्णयानुसार उप जिल्हाधिकारी संवर्गाची दिनांक ०१/०१/१९९९ ते दिनांक ३१/१२/२००३ या कालावधीची अंतिम सेवा ज्येष्ठतासूची शासन परिपत्रक दिनांक ३१/१२/२०२० अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच, शासन परिपत्रक दिनांक २९/०७/२०२२ अन्वये दिनांक ०१/०१/२००४ ते दिनांक ३१/१२/२००६ या कालावधीची तात्पुरती सेवा ज्येष्ठता यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

शासन परिपत्रक दिनांक ३१/१२/२०२० अन्वये प्रसिध्द अंतिम ज्येष्ठतासूचीबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल रिट याचिका क्र.४९०८/२०२१ व रिट याचिका क्र.२६१२/२०२१ मध्ये दिनांक १०/०२/२०२१ रोजीच्या न्यायनिर्णयान्वये जैसे-थे (Status-Quo) चे आदेश पारित केले होते. तद्नंतर मा.उच्च न्यायालयाने उक्त दोन्ही याचिका दिनांक १७/०३/२०२१ रोजीच्या आदेशान्वये जैसे-थे (Status-Quo) आदेशासह मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे (T.A.०१/२१)(रिट याचिका क्र.४९०८/२०२१) व (T.A.०२/२१)(रिट याचिका क्र.२६१२/२०२१) वर्ग केल्या होत्या. मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दिनांक २६/०८/२०२२ रोजी अंतिम आदेश पारित केले आहेत. सदर अंतिम आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे शासनाने रिट याचिका क्र.११६९२/२०२२ व रिट याचिका

क्र.११७६२/२०२२ व्यतिरिक्त अपर जिल्हाधिकारी संवर्गातील (सरळसेवा व पदोन्नत) अधिकाऱ्यांनी ५ याचिका अशा एकूण ७ याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सदर याचिकांवरील अंतिम सुनावणी पूर्ण झाली असून अंतिम निर्णय अद्यापि प्रलंबित आहे.

शासन परिपत्रक दिनांक ३१/१२/२०२० अन्वये प्रसिध्द अंतिम ज्येष्ठतासूचीबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे मूळ अर्ज क्र.२३६/२०२१ व मूळ अर्ज क्र.२३७/२०२१ दाखल करण्यात आले होते. सदर अर्जावर झालेल्या मा.न्यायधिकरणाने दिनांक २७/०७/२०२१ रोजी दिलेल्या अंतरिम आदेशाद्वारे याचिकांकर्त्यांनी सेवा ज्येष्ठतासूचीला स्थगिती देण्याची केलेली मागणी अमान्य केलेली आहे.

महसूल व वन विभागांतील अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातून भरण्यात येणारी उपायुक्त (महसूल), उपायुक्त (सामान्य) तसेच, अध्यक्ष, जिल्हा जात पडताळणी समिती अशी महत्वाची पदे रिक्त आहेत. तसेच, अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी), अपर जिल्हाधिकारी व उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातील पदोन्नत्या सेवाज्येष्ठता अभावी होत नाहीत. उक्त वस्तुस्थिती मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निदर्शनास आणून प्रलंबित असलेल्या याचिका लवकरात लवकर निकाली काढण्याची विनंती मा.उच्च न्यायालय, मुंबई यांना करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वाळुज महानगर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथे दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करणेबाबत

**(७) २३०५७ (१८-०५-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाळुज महानगर (जि.छत्रपती संभाजीनगर) परिसरात मोठ्या प्रमाणावर जमीन/ घर व प्लॉटच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार होत असून वाळुज, रांजणगांव, जोगेश्वरी, कमळापूर, घाणेगांव, विटावा, एकलहेरा, नांदेडा, अंबेलोहळ या परिसरातील नागरिकांना खरेदी -विक्रीच्या नोंदणीसाठी गंगापूर येथे ५० कि.मी. फेरा मारून जावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाळुज (जि.छत्रपती संभाजीनगर) येथे दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्यासाठी वाळुज परिसरातील ग्रामस्थांनी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक पुणे यांच्याकडे वेळोवळी मागणी केली असून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वाळुज परिसरात दुय्यम निबंधक कार्यालय सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०९-०७-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) वाळुज, ता.गंगापूर येथे दुय्यम निबंधक कार्यालय सुरू करण्याबाबत केलेल्या विनंतीस अनुसरुन, नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून मागविण्यात आलेला अहवाल प्राप्त झाला असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शेडुंग, पनवेल येथील जमिनीमध्ये अनधिकृत गौणखनिजांचे उत्खनन केल्याबाबत

**(८) २३२१२ (३०-०५-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेडुंग, पनवेल येथील सर्व्हे नं.९२/अ/१ या जमीन मिळकतीमध्ये सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटीने अनधिकृत ९६६ ब्रास गौणखनिजांचे उत्खनन केले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी अप्पर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय, पनवेल यांनी अध्यक्ष, सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी यांना नोटीसही बजावली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाच्या महसूलाचे नुकसान करणाऱ्या व अनधिकृतपणे गौणखनिज उत्खनन करणाऱ्या संस्थेविरुध्द शासनाने कोणत्या स्वरुपाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०८-०७-२०२४) :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) अपर तहसलिदार, पनवेल यांनी अध्यक्ष, सेंट विल्फ्रेड एज्युकेशन सोसायटी यांना दिनांक १५/०३/२०२४ रोजी बजाविण्यात आलेल्या नोटीसच्या अनुषंगाने संबंधितानी खुलासा सादर केला असून, सदर प्रकरण सुनावणीवर प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केळी पिकाला फळाचा दर्जा देण्याबाबत

**(९) २३३८७ (३०-०५-२०२४) श्री.एकनाथराव खडसे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात केळीचे उत्पादन व निर्यात मोठ्या प्रमाणात होत असूनही अद्याप शासनाच्या फळांच्या यादीत केळी पिकाचा समावेश नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केळी पिकाचे आयुष्यमान केवळ १८ महिन्यांचे असल्याने तसेच फळांच्या यादीत केळी पिकाचा समावेश नसल्याने नैसर्गिक आपत्तीमध्ये नुकसान झाल्यास अत्यंत अल्प मदत मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, केळी पिकाचा राज्य सरकारच्या फळांच्या यादीत समावेश झाल्यास निर्यातीसाठी शासनातर्फे सोयीसुविधा, नैसर्गिक आपत्तीने नुकसान झाल्यास मोबदला तसेच केळी पिकाच्या उतीसंवर्धक रोपांसाठी अनुदान व देखभालीचा खर्च मिळू शकतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, केळी पिकाला फळांचा दर्जा देण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०८-०७-२०२४) :** (१) व (२) हे खरे नाही.

केळी पिकाचा फळपिकामध्ये समावेश गृहित धरुनच निर्यात केली जाते. केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निकषाच्या धर्तीवर नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित होणाऱ्या फळपिकांप्रमाणे मदत अनुज्ञेय असून त्यानुसार केळी पिकाकरीता मदत देण्यात येते.

(३) अंशत: खरे आहे.

महसूल व वन विभागाच्या दिनांक ०१/०१/२०२४ रोजीच्या शासन अन्वये पिकाच्या नुकसानीसाठी प्रति हेक्टरी रुपये ३६०००/- या प्रमाणे मदत देण्यात येते. शिवाय मुख्यमंत्री कृषी प्रक्रिया योजना, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान व राष्ट्रीय बागवाणी मंडळ, महात्मा गांधी रोजगार हमी फळबाग लागवड योजना, प्रधानमंत्री फसल बिमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना, फळपिकावरील कीड रोग सर्वेक्षण, सल्ला व व्यवस्थापन प्रकल्प (हॉर्टसॅप) इत्यादी योजनांमध्ये केळी पिकास फळपीक गृहित धरुनच मदत केली जाते

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भोर आणि वेल्हे (जि.पुणे) तालुक्यात सुरू असलेल्या वनव्यामुळे निसर्ग संपदा आणि पर्यावरण साखळी धोक्यात आली असल्याबाबत

**(१०) २३५०९ (१७-०६-२०२४) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोर आणि वेल्हे (जि.पुणे) तालुक्यात सुरू असलेल्या वणव्यामुळे सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये असलेली निसर्ग संपदा आणि पर्यावरणास, औषधी वनस्पती, जंगली प्राणी, पक्षी, कीटकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असल्याची तसेच कोट्यवधी रुपयांची वित्तहानी होत असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भोर तालुक्यातील वरंधा घाट, मांढरादेवी घाट, भाटघर आणि निरा-देवदर धरणांचा परिसर आणि गड किल्ल्याजवळच्या डोंगरांमध्ये पर्यटकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असून दररोज शेकडो पर्यटक वरंधा घाटातून महाडकडे जात असतात त्यातील काही पर्यटकांच्या धुम्रपानामुळेही वणवे लागतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वन विभागाच्यावतीने गावोगावी स्थापन केलेल्या वन संरक्षण समित्या या नाममात्र असून त्यांचेमार्फत वणवे न लावण्याबाबत कोणतीही जनजागृती केली जात नसल्याने वन संरक्षण समितीचा मुख्य हेतूच असफल झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वणव्यांवर नियंत्रण मिळविण्याकरीता वन संरक्षण समितीला पुरेशा सोयी सुविधा आणि मानधन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०१-०७-२०२४) :** (१) भोर तालुक्यातील सन २०२३-२४ या वर्षामध्ये मार्च, २०२४ अखेर भोर, नसरापूर (वनक्षेत्राचा काही भाग पश्चिम बाजू सहयाद्रीच्या मुख्य डोंगररांगामध्ये येत आहे) व वेल्हे वनक्षेत्रामध्ये वणव्याचे एकूण २५ वनगुन्हे नोंद झालेले असून त्यामध्ये एकूण ३७.८ हेक्टर क्षेत्र जळीत झालेले आहे.

(२) भोर तालुक्यातील भोर वनक्षेत्रामध्ये सन २०२३-२४ मध्ये वणव्याचे एकूण ४ वनगुन्हे नोंद झालेले असून त्यामध्ये एकूण ८ हेक्टर क्षेत्र जळीत झालेले आहे.
(३) व (४) वनवणवा नियंत्रणासाठी भोर वनविभागाअंतर्गत उपलब्ध वन कर्मचारी यांना वनांचे संरक्षणाठी वनाशेजारी असणाऱ्या गावांमध्ये गावपातळीवर संयुक्त वन व्यवस्थापन समित्यांची स्थापना करण्यात आली आहे.

जर वणवा लागला तर संयुक्त वन व्यवस्थापन समिती मधील सदस्य, ग्रामस्थ वणवा विझविण्यासाठी सहकार्य करतात. संयुक्त वन व्यवस्थापन समिती सहकार्य करत असल्याने समितीचा मुख्य हेतू बाजुला राहिलेला नाही.

वन कर्मचारी संयुक्त वन व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामस्थ यांच्या सहकार्याने फायर ब्लोअर, ग्रास कटर मशीनचा वापर करुन वणवा ताबडतोब विझविण्याची कार्यवाही करतात.

Forest Survey of india (FSI) कडून क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी त्यांचे नोंदणी केलेल्या मोबाईल क्रमांकावर वणवा लागल्याचे फायर अलर्ट येते व त्यावर तात्काळ कार्यवाही करण्यात येते.

भोर तालुक्यातील भोर व नसरापूर वनक्षेत्रामध्ये तसेच वेल्हे वनक्षेत्रामध्ये वणवे लागणार नाहीत याबाबत भिंती पत्रके, पॅम्पलेट छापून गावोगावी त्याचे वाटप करुन ग्रामस्थांसोबत सभा घेऊन जनजागृती केली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील रोजगार हमी योजनेचे काम करणाऱ्या मजूरांच्या मजुरीत वाढ करण्याबाबत

**(११) २३५२७ (३०-०५-२०२४) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वाढत्या महागाईच्या काळात रोजगार हमी योजनेचे काम करणाऱ्या मजुरीत केवळ रुपये २४ इतकी केलेली वाढ अल्प असल्याने या मजुरांनी किमान रुपये १०० एवढया रकमेची वाढ करण्याची मागणी केली असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन रोजगार हमी योजनेच्या मजुरीत वाढ करुन मजुरांचे उदरनिर्वाहासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संदीपानराव भुमरे (०५-०७-२०२४) :** (१) असे निवेदन शासनास प्राप्त झाले नाही.
(२) मनरेगा ही केंद्रपुरस्कृत योजना आहे. त्यामुळे मजुरांच्या मजुरीत वाढ करणे ही बाब केंद्रशासन स्तरावरील आहे.
(३) विलंब झालेला नाही.

---

## खालापूर (जि.रायगड) येथील तांबाटी गावातील आदिवासींची घरे पाडल्याबाबत

**(१२) २३९२६ (१७-०६-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर (जि.रायगड) येथील तांबाटी गावामध्ये सरकारने आरक्षित केलेल्या २५ एकर गुरचरण क्षेत्र जागेवर ‘टाटा कॅन्सर हॉस्पिटल’ उभारण्यात येणार असून त्याकरीता प्रशासनाने स्थानिक ग्रामपंचायतीतील ग्रामस्थांना विश्वासात न घेता व पोलीस बंदोबस्तात बळजबरीने बुलडोजरने आदिवासींची घरे तसेच जोते पाडल्याने यासंदर्भात आदिवासींनी खालापूर पोलीस ठाण्यात मोर्चा काढून अधिकाऱ्यांच्या विरोधात माहे एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वरील जागा गावठाण क्षेत्रात येत असल्याने गावाकरीता जागा राखून ठेवावी तसेच पाच एकर जमीन मैदान व गुरे चारण्यासाठी ठेवावी अशी मागणी तांबाटी गावातील रहिवाशांनी केली असल्याची बाब दिनांक १९ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आदिवासींना नुकसान भरपाई देण्याबाबत तसेच गावाकरीता जागा आरक्षित ठेवण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०८-०७-२०२४) :** (१), (२) व (३) मौजे तांबाटी, ता.खालापूर, जि.रायगड येथील स.नं.१अ/१/अ, क्षेत्र १४-३८.२० हे.आर पैकी १०-००.०० हे.आर शासकीय गुरचरण जमीन टाटा मेमोरियल सेंटर, मुंबई यांना कॅन्सर रिसर्च सेंटर व हॉस्पिटल (औषधी वनस्पती लागवड व आयुर्वेदिक रुग्णालय) करीता शासन ज्ञापन दिनांक १०/०३/२०२२ अन्वये ३० वर्षांच्या कालावधीसाठी नाममात्र रुपये १/- या दराने वार्षिक भुईभाडे आकारुन भाडेपट्टयाने प्रदान करण्यात आली आहे.

ताबा प्राप्त झालेनंतर टाटा मेमोरियल सेंटर यांचेकडून उप अधीक्षक भूमी अभिलेख, खालापूर यांचेमार्फत हद्द निश्चित करुन संरक्षक भिंतीचे काम सुरु करण्यात आले आहे. टाटा मेमोरियल सेंटर यांचेमार्फत हद्द निश्चिती व संरक्षक भिंतीचे काम करताना कोणत्याही प्रकारे तांबाटी आदिवासी वाडीतील ग्रामस्थांच्या अथवा गावातील अन्य ग्रामस्थांच्या राहत्या घरांची मोडतोड अथवा हानी पोहचविण्यात आलेली नाही. तसेच तांबाटी गावातील ग्रामस्थ अथवा तांबाटी आदिवासी वाडीतील ग्रामस्थांना कोणत्याही प्रकारे विस्थापित करण्यात आलेले नाही. यास्तव तांबाटी आदिवासी वाडीतील आदिवासी बांधवांचे पुनर्वसन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

मौजे तांबाटी, ता.खालापूर येथे टाटा मेमोरियल कॅन्सर रिसर्च सेंटर व हॉस्पिटल प्रकल्पाविरोधात दिनांक २२/०३/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत तहसिल कार्यालय येथे आक्रोश मोर्चा काढणार असलेबाबत अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेकडून दिनांक १८/०३/२०२४ रोजी तहसिल कार्यालय खालापूर यांना कळविले होते. तद्नंतर श्री.राजू सखाराम सुतक, खालापूर तालुका अध्यक्ष, अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद यांचेमार्फत सदरचा आक्रोश मोर्चा स्थगित केलेबाबत तहसिलदार, खालापूर व पोलीस ठाणे खालापूर यांना कळविण्यात आले आहे.

तांबाटी ग्रामास्थांनी तहसिलदार, खालापूर यांना दिनांक १२/०३/२०२४ च्या निवेदनाद्वारे टाटा मेमोरियल हॉस्पिटलला पाठिंबा दर्शविण्याबाबत कळविले असून गावातील मुलांना खेळण्यासाठी मैदान उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली असून सदर निवेदनाच्या अनुषंगाने उप अधीक्षक, भूमि अभिलेख, खालापूर यांना मौजे तांबाटी स.नं.१/अ/१अ मध्ये वाटपाकरीता उपलब्ध क्षेत्राच्या अनुषंगाने अहवाल सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.

दरम्यान श्री.बिपीन अशोक भोसले यांनी उक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.४०७६/२०२४ दाखल केली असून जमीन प्रदान आदेशास आव्हानित करण्यात आले आहे. सदर बाब न्यायप्रविष्ट आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मीरा-भाईदर महानगरपालिकेने नोंदणीकृत करारनामा करून मुद्रांक शुल्क भरलेला नसताना अनेक विकासक, अधिकारपत्रधारकांना बांधकाम परवानग्या व टीडीआर दिल्याबाबत

**(१३) २३९८९ (१७-०६-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईदंर महानगरपालिकेने नोंदणीकृत करारनामा करून मुद्रांक शुल्क भरलेला नसतानाही अनेक विकासक, अधिकारपत्र धारकांना भूमी अधिग्रहण करुन बांधकाम करण्याकरीता ट्रान्सफर ऑफ डेव्हल्पमेंट राइट्स (टीडीआर) दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक विकसन करार, कार्यकंत्राट, भाडेपट्टा प्रकरणी मुद्रांक शुल्क भरला नसल्याबाबत मीरा-भाईदंर महानगरपालिकेची चौकशी सुरु असून महानगरपालिकेच्या कागदपत्रांच्या तपासणीकरीता ९ शासकीय अधिकाऱ्यांच्या विशेष तपासणी पथकाची नियुक्ती केली असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या पहिल्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पथकाने केलेल्या तपासणीचा स्वयंस्पष्ट अहवाल अभिप्रायासह सादर केला आहे काय, सदर अहवालात काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०८-०७-२०२४) :** (१) हे अंशत: खरे आहे
(२) होय.
नोंदणी महानिरीक्षक कार्यालयाचे आदेश क्र.का.९/आस्था-४/नियुक्ती/३३५/२०२४, दिनांक १२/०२/२०२४ अन्वये विशेष तपासणी पथक गठीत करण्यात आले आहे.
(३) सदर प्रकरणाची तपासणी पथकाकडून चौकशी चालू असन तपासणी पथकाचा अहवाल शासनास अप्राप्त आहे. पथकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील माळढोक अभयारण्यातील माळढोक पक्षी विजेच्या तारांमुळे मृत्यूमुखी पडत असल्याबाबत

**(१४) २४०३१ (१७-०६-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळढोक पक्षाचा अभ्यास करण्यासाठी वाईल्ड लाईफ इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाच्या माध्यमातून सॅटेलाईट व ट्रान्समीटर बसविण्यात आले असून संशोधनानुसार सदर पक्षी विजेच्या तारांना धडकून मृत्यूमुखी पडत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माळढोक अभयारण्यातील संशोधनाचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, या अहवालानुसार माळढोक अभयारण्यातील पक्षाच्या मृत्यूसाठी कारणीभूत ठरणाऱ्या विजेच्या तारा भूमिगत करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०१-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) माळढोक पक्षी अभयारण्यामधून गेलेली ३३ के. व्ही. विद्युत लाईन अभयारण्य क्षेत्राबाहेर स्थलांतरीत करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मिरज (जि.सांगली) येथील बंद अवस्थेतील शासकीय दूध योजना पशुसंवर्धन विभागाकडे वर्ग करण्याबाबत

**(१५) २४०३५ (१७-०६-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरज (जि.सांगली) येथे बंद अवस्थेत असलेल्या शासकीय दूध योजना पशुसंवर्धन विभागाकडे वर्ग करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या दूध डेअरीची स्थापना १९५७ साली झाली असून मुंबईला वॅगन मधून दूध पुरवठा करणारी ही डेअरी कायमस्वरूपी बंद करण्यात आल्याने खाजगी दुध संस्था उदयास येऊन या दूध संस्था दूध उत्पादक ग्राहकाला योग्य तो भाव देत नसल्याने या डेअरीचे शासन पुनर्जीवन करून राज्यभरातील शेतकऱ्यांना व दूध ग्राहकांना दिलासा देणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डेअरीच्या ५५ एकर जागेवर आधुनिक पध्दतीने दुधाचे संकलन करून रेल्वे वॅगनद्वारे मुंबई आणि इतर ठिकाणी दुधाचे वितरण करण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करून योग्य ती कार्यवाही तसेच पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०६-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कारेघाट आणि चिंचपाडा (ता.नवापूर, जि.नंदुरबार) या दोन वनक्षेत्रात मंजूर केलेल्या लेपर्ड कॉरिडोर प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१६) २४०७५ (१७-०६-२०२४) श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान कारेघाट आणि चिंचपाडा (ता.नवापूर, जि.नंदुरबार) या दोन वनक्षेत्रात लेपर्ड कॉरिडोर मंजूर केले असून सदर संरक्षित वन क्षेत्रासाठी विकास आराखडा वनविभाग आणि शासनाकडे सादर करूनही सदर प्रकल्पाला अद्याप निधी मंजूर झाला नसल्याने हा प्रकल्प प्रलंबित असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उपरोक्त प्रकरणी स्थानिकांना रोजगार आणि पर्यटनाला चालना देणाऱ्या सदर लेपर्ड कॉरिडोर प्रकल्पास लवकरात लवकर निधी उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०८-०७-२०२४) :** (१), (२) व (३) दिनांक २१/०९/२०२२ रोजी आयोजित राज्य वन्यजीव मंडळाच्या १९ व्या बैठकीत कारेघाट व चिंचपाडा क्षेत्रातील वन्यजीवांच्या अधिवासाचे संरक्षण करण्याकरीता संवर्धन राखीव क्षेत्र घोषित करण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तथापि, सदर क्षेत्रामध्ये वन हक्क दाव्यासंदर्भात खातरजमा करुन संवर्धन राखीव क्षेत्राची अधिसुचना निर्गमित झाल्यानंतर क्षेत्राच्या व्यवस्थापनाकरीता व्यवस्थापन आराखडा तयार करणे अपेक्षित आहे.

---

## मुंबईसह कोकणातील सर्व सात जिल्ह्यातील खारफुटीच्या क्षेत्राचे वन विभागाकडे हस्तांतरण करण्यात दिरंगाई होत असल्याबाबत

**(१७) २४१५९ (१७-०६-२०२४) : श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारफुटीच्या ऱ्हासामुळे पर्यावरणाचा समतोल बिघडत असल्याबाबतच्या तक्रारी पर्यावरण प्रेमींकडून होत असल्याने मुंबईसह कोकणातील सर्व सात जिल्ह्यातील खारफुटींचे नव्याने सर्वेक्षण करण्याचे निर्देश महाराष्ट्र खारफुटी विभागाने महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लीकेशन सेंटर (एमआरएसएसी) ला दिल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खारफुटीच्या ऱ्हासामुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणावर समतोल बिघडत असल्याच्या पार्श्वभूमीवर मा.मुंबई उच्च न्यायालयाने खारफुटी क्षेत्राचे वन विभागाकडे हस्तांतरण करण्याचे आदेश राज्य शासनाला दिलेले असतानाही अद्याप खारफुटीचे संपूर्ण क्षेत्र वन विभागाकडे हस्तांतरित करण्यास विलंब होत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील संपूर्ण खारफुटी क्षेत्राचे वन विभागाकडे लवकरात लवकर हस्तांतरित होण्याच्या दृष्टीने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०१-०७-२०२४) :** (१) महाराष्ट्रातील ७ सागर तटीय जिल्ह्यातील (पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई, मुंबई उपनगर) कांदळवन क्षेत्राचे Latest High Resolution Satellite Data वापरुन नवीन अद्यावत नकाशे तयार करण्याकरीता महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग एप्लीकेशन सेंटर (MRSAC) व कांदळवन कक्ष यांच्यामध्ये दिनांक २९/०१/२०२४ रोजी सामंजस्य करार (Memorandum of Understanding) करण्यात आला आहे.
(२) व (३) राज्यातील विविध शासकीय विभागाच्या ताब्यातील कांदळवन क्षेत्र वन विभागाला हस्तांतरीत करण्याबाबत मा.उच्च न्यायालय यांनी दिनांक १७/०९/२०१८ अन्वये आदेश पारित केले आहेत. त्यानुसार सद्य:स्थितीत विविध शासकीय विभागाच्या ताब्यातील एकूण २३८७०.६१ हे.आर क्षेत्र वन विभागास हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. उर्वरित क्षेत्राच्या हस्तांतरणाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोंकण व अपर मुख्य सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत आढावा घेण्यात येऊन क्षेत्राच्या हस्तांतरणाबाबत कार्यवाहीचे निदेश देण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## श्रीवर्धन (जि.रायगड) तालुक्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटक यांच्यासाठी शुध्द पाणीपुरवठा होत नसल्याबाबत

**(१८) २४२५१ (१७-०६-२०२४) : श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोर्लीपंचतन, वाळवंटी, भोस्ते, दांडगुरी, आदगाव (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) इत्यादी गावातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटक यांच्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग माध्यमातून उपयोजनेंतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, रायगड यांनी प्रत्येक वाडीवर एक वर्षापूर्वी जलशुद्धीकरण यंत्र बसविले असून या योजनेसाठी प्रत्येकी ८ लाख रुपये निधी वापरण्यात आलेला असून योजना प्रलंबित असल्यामुळे आजमितीस शुध्द पाणीपुरवठा सुरू झालेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जलशुद्धीकरण योजनांचे काम तातडीने पूर्ण करून या योजनेचा लाभ सदर कुटुंबांना मिळावा अशी मागणी अनुसूचित जाती व नवबौध्द घटक यांच्याकडून सातत्याने होत असल्याने शासनाने जलशुद्धीकरण योजना तातडीने लागू करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गुलाबराव पाटील (०४-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.

बोर्लीपंचतन, वाळवंटी, भोस्ते, दांडगुरी, आदगाव (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) इत्यादी गावातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटक यांच्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग माध्यमातून उपयोजनेंतर्गत सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभाग, रायगड यांनी सदर ५ कामांसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. प्रत्येकी कामाची किंमत रुपये ९,९६,०००/- इतकी आहे. यापैकी प्रत्येक कामासाठी रुपये ६,६४,०००/- निधी उपलब्ध करून दिला आहे.

सदर कामे पूर्ण झाली असून पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.

(२) बोर्लीपंचतन, वाळवंटी, भोस्ते, दांडगुरी, आदगाव येथे जलशुद्धीकरण योजनांची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. पाणीपुरवठा सुरु करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात विशेषत: विदर्भातील वर्धा, चंद्रपूर तसेच गडचिरोली जिल्ह्यातील घरकुल धारकांना स्वस्त दरात वाळू उपलब्ध करुन देणेबाबत

**(१९) २४२८४ (३०-०५-२०२४) श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासनाने वाळू धोरण लागु करुन स्वस्त दरात वाळू उपलब्ध करुन देण्याची घोषणा करुनही अद्याप त्यांची प्रभावी अंमलबजावणी न झाल्याने राज्यात विशेषत: विदर्भातील वर्धा, चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील घरकुल धारकांना वाळूसाठी दुप्पट पैसे मोजावे लागत असल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वाळूची अवैध वाहतूक व महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील प्राणघातक हल्ले यावर आळा घालण्यासाठीही स्वतंत्र धोरण अवलंबविण्याचे शासनाकडून आश्वासन देण्यात आले होते, हे खरे आहे काय, असल्यास, या नवीन धोरणाची प्रत्यक्षात अंमलबजावणी झाली आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर अवैध वाहतूक व महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील प्राणघातक हल्ले करण्यावर आळा घालण्यासाठी तसेच घरकुल धारकांना वाळू स्वस्त दरात उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०८-०७-२०२४) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) राज्यातील वाळूच्या अवैध उत्खनन/वाहतूकीस परिणामकारक आळा घालण्यासाठी वाळूचे अवैध उत्खनन/वाहतूक करणे, अशा कृत्यात सहभागी होणे, प्रोत्साहन देणे अशा व्यक्तींविरूध्द एमपीडीए कायद्यांतर्गत कारवाई करण्यासाठी, सदर अधिनियमात "वाळू तस्कर" या शब्दांचा समावेश करण्यात आला असून सदर अधिनियमानुसार वाळू तस्करांवर कारवाई करण्यात येते.
सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर केलेल्या यादीतील घरकूल लाभार्थ्यांना ५ ब्रासपर्यंत विनामुल्य वाळू उपलब्ध करुन देण्याची तरतूद सुधारित वाळू धोरणात केली असून वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्यातील घरकूल लाभार्थ्यांना खालीलप्रमाणे वाळू उपलब्ध करुन दिली आहे.

| | |
|---|---|
| वर्धा :- | १११८ घरकूल लाभार्थ्यांना २,७९५ ब्रास. |
| चंद्रपूर :- | ३८४ घरकूल लाभार्थ्यांना १,६९६ ब्रास |
| गडचिरोली :- | ५,१८८ घरकूल लाभार्थ्यांना २३,१८५ ब्रास |

---

## राज्यातील दुग्ध व्यवसाय अडचणीत आल्याबाबत

**(२०) २४३३० (१७-०६-२०२४) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांच्या उपजिविकेचे महत्वाचे साधन असलेला दूध व्यवसाय तसेच महानंद, आरे, गोकुळ इत्यादी अनेक नामांकित दुध संघ आर्थिक अडचणीत सापडल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील दूधाला कमी भाव, दूधात भेसळ, मनमानी कारभार, गैरव्यवहार व स्थानिक राजकारण इत्यादी अनेक कारणांमुळे राज्यातील दूध संघ प्रचंड तोट्यात जात असून प्रशासकीय खर्च भागविणे कठीण होत असल्याने राज्यातील अनेक दूध संकलन केंद्रे व दुग्धजन्य पदार्थ निर्मिती करणाऱ्या कंपन्या बंद होण्याचा मार्गावर आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने राज्यातील दुग्ध व्यवसाय सुरळीतपणे चालू करुन आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२७-०६-२०२४) :** (१), (२), (३) व (४) जागतिक खुल्या आर्थिक धोरणामुळे सर्वच क्षेत्रात खाजगी क्षेत्राचा वाटा वाढत असून त्याला दुग्धव्यवसायही अपवाद नाही. खाजगी दूध संघाकडे असणारी तंत्रज्ञानस्नेही बाजाराधिष्ठित यंत्रणा यामुळे सहकारी दूध संघांना खाजगी दूध प्रकल्पासोबत स्पर्धा करावी लागत आहे.

राज्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे दुग्धव्यवसाय हा उपजीविकेचे साधन असून, यादृष्टीने शासन सहकार क्षेत्रातील दुधव्यवसायाच्या उन्नतीसाठी वेळोवेळी प्रयत्न करत असून, याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून शासनाने दूधव्यवसायातील सहकार क्षेत्रातील महानंद या शिखर संस्थेचे पुनरूज्जीवन करण्याचा निर्णय घेतला आहे.

दूधाचे दर हे प्रामुख्याने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारातील दूध भुकटी व बटरचे दर यावर अवलंबुन असतात. दुधाच्या पुष्ट काळात दूधाचे दर घसरतात, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक हित जोपासण्यासाठी शासन बाजारात वेळोवेळी हस्तक्षेप करुन दूध उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहे. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून शासनाने राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दूधाला प्रतिलिटर रुपये ५/- अनुदान देण्याचा निर्णय घेतला. सदर योजना २ महिन्यांसाठी राबविण्यात आली होती.

दूध अनुदान योजनेतंर्गत आतापर्यंत रुपये २३०.५० कोटी इतके अनुदान दूध उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या बँक खात्यावर थेट वर्ग करण्यात आले आहे.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.